Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26, Published on 15th of every month



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार



वर्ष ५७ वे, अंक ९वा, मुंबई । नोव्हेंबर २०२४
एकूण पाने २० । प्रती अंक ₹ ५ । वार्षिक वर्गणी ₹ ५०

Year : 57, Issue : 9, Mumbai I November 2024
Total Pages 20 I Price per Issue ₹ 5 I Yearly Subscription ₹ 50



## प्रदूषण मुक्त दिवाळी...




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण

# समाचार

वर्ष ५७वे, अंक ९वा,
नोव्हेंबर २०२४
(फक्त सभासदांसाठी)



**श्री. महेंद्र गंधे**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. विनोद मांडके**
कोषाध्यक्ष

**श्री. मिलिंद सरदेशमुख**
कार्यवाह



**संपादक**
**श्री. मिलिंद सरदेशमुख**
मो. : ९८६७९९४३८९



अंकातील मजकूराशी मंडळ
सहमत असेलच असे नाही



दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३
ई–मेल : aadrbm@gmail.com
संकेतस्थळ : www.adrbmmahim.in




दे.ऋ.ब्रा. डोंबिवली तर्फे विद्यार्थी मदत कार्यक्रम



दे. ऋ. ब्रा. शि. संस्था सोलापूर विद्यार्थी शिष्यवृत्ती वाटप कार्यक्रम



दे. ऋ. ब्रा. संस्था संभाजीनगर विद्यार्थी शिष्यवृत्ती वाटप सोहळा



क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत।
MELGIRI FARMS
Relaxing Huts
Tamarind Umbrella
Toy Train
Pottery
Kids Play Area
Bullocart
Farm Visit 365 Days Bhutta Party Sept & Oct
Hurda Party Dec-feb Farm Tourisim 365 Days
Kitty Parties 365 Days Birthdays 365 Days
Get Togethers 365 Days Dairy Farm Visit 365 365 Days
Glamping 365 365 Days
Pre & Post Wedding Shoots
Agro Tourism For Schools & Corporates
Direct from FARM FRESH Vegetables & fruits at Your Doorstep on SAME DAY
For BOOKINGS Call:
70137 78442 | 97039 77724
Farm: S.No. 66, 67, 75 & 76A, Yenkepalli, Bakaram Road, Moindabad Mandal, R.R. Dist, Telangana - 500075
R.O. For Correspondence: 3-4-22, Venkatesh Bhuvan, Dr. Bhoomanna Lane, Kachiguda, Hyderabad 500027
/Melgiri Farms
Just 30 mins Drive from Gachibowli & Hitech City

WITH
BEST
COMPLIMENTS
FROM

Ravindra Deshpande

REC

# RASHMI
# ELECTRICAL & CONTRACTOR

Off. No. 2, Shree Siddhivinayak Commercial Complex,
Near Siddhivinayak Temple, Sector 10,
Airoli, Navi Mumbai 400708.
Mob. : +91 98330 71906, +91 98202 68478
Email : recprojects7@gmail.com

# संपादकीय

सण मग ते कोणतेही असुद्या उत्तम प्रकारे निसर्गाचा समतोल राखूनच साजरे केले पाहिजेत. दही हंडीच्या उत्सवाला तर हल्ली स्पर्धेच स्वरूप आलं आह. गणेश उत्सवाच्या मिरवणूकीतील डीजे, लेझर लाईट्स, दसऱ्यामधील उंची आवाजात कानठळ्या बसतील अशी गाणी, दिवाळीत फटाक्याची आतशबाजी, या सगळ्याची गरज आहे? उत्सव हे मनाला आनंद देणारे असावेत. दिवाळीतील फटाके व प्रदूषण विरोधी जनजागृती ही नागरिकांची जबाबदारी आहे. प्रदूषण विरोधी जनजागृती मोहिमेकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल. मुंबईतील हवा आरोग्यास हानिकारक असल्याचे तज्ज्ञांचे मत वेळीच लक्षात घेणे आवश्यक आहे. दिवाळीत मुंबईतील शिवडी, नेव्हीनगर, कुलाबा आणि वांद्रे कुर्ला संकुल येथील हवेचा निर्देशांक अनुक्रमे २२१, २२६, २२२ इतका झाला होता. हवा धोकादायक स्तरावर होती. पावसाळ्यानंतर मुंबईतील वाऱ्याची स्थिती बदलते, वेग मंदावतो, त्यामुळे हवेत साचलेली धूळ प्रदूषके याचा निचरा होत नाही. याच्यामुळे धुलीकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणाबरोबरच अनेक मानवनिर्मित कारणे ही मुंबईच्या प्रदूषणात भर घालित आहेत. पायाभूत सुविधा, रहिवासी व व्यावसायिक संकुले तसेच नवे प्रकल्प बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदविण्यात येत आहे. मुंबई पाठोपाठ ठाणे येथेही हवेचे प्रदूषण दिसून येत आहे. मुंबई व ठाणे येथील मोठमोठ्या गृह संकुलामध्ये फटाक्याची आताशबाजी मोठ्या प्रमाणावर दिसून आली. मोठ्या माळा, आवाजी फटाक्यासह शोभेच्या फटाक्याचे प्रमाण जास्त होते. फटांक्यामुळे हवेत मोठ्या प्रमाणावर धूर पसरला होता. फटाके बंदी धाब्यावर बसवून दिल्लीमध्ये दुसऱ्या दिवशी वाढलेल्या वायू प्रदूषणाच्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली सरकारला पुन्हा फटकारले आहे. फटाक्यावर बंदीची कठोर अंमलबजावणी का केली नाही याचे उत्तर आठवड्यात द्या असे माननीय न्यायालयाने सरकारला बजावले आहे. दिवाळीत फटाके वाजवताना नेमकी कोणती काळजी घ्यावी यासाठी मुंबई अग्निशामक दलाने काही सूचना केल्या होत्या मात्र या सूचनांचे पालन होताना दिसत नाही. परिणामी फटाके फोडण्याच्या उत्साहामुळे आगीच्या घटनांना निमंत्रण दिले जात आहे.

मुंबईकरांनी दिवाळी अधिकाधिक पर्यावरणपूरक साजरी करावी. ध्वनी विरहित, प्रदूषण विरहित फटाक्यांचा वापर व्हावा अशी अपेक्षा आहे.

शाळा, महाविद्यालये, मोठमोठी गृहसंकुले यामध्ये आवाजी फटाक्या विरोधात झालेली जनजागृती आणि ध्वनीसह वायू प्रदूषणाबाबत जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे. हवेतील प्रदूषण आरोग्यास अपायकारक होत असल्याने हे थांबविणे आपल्या हातात आह. चला तर आपणच फटाक्याना नाही म्हणू या. आणि हवेतील प्रदूषण टाळू या. येणारे नवीन वर्ष आपणां सर्वांना सुख समृद्धी, आरोग्यदायी जावो हीच सदिच्छा!

## देणगी

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे नवनिर्वाचित कार्यवाह श्री. आनंद कृष्णा कुलकर्णी यांनी मध्यवर्ती मंडळास वर्धापन दिनानिमित्त रुपये सहा हजाराची देणगी दिली आहे.
कृतज्ञता देणगीबद्दल श्री. आनंद कुलकर्णी यांचे आभार.

# नुपेक्षी कदा रामदासाभिमानी भाग ७

**स.भ. मोहनबुवा रामदासी** (मो. : ९१४६८५५६९१)

**उपेक्षी कदा रामरुपी असेना। जिवां मानवां निश्चयो तो वसेना।।**
**शिरी भार वाहेन बोले पुराणीं। नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३४।।**

समर्थ रामदास स्वामींचा हा श्लोक रामभक्तांच्या जीवनातील आदर्श आणि त्यांच्या गुणांची ओळख करून देतो. त्यामध्ये रामभक्तांची निस्सीम निष्ठा, नम्रता आणि सेवाभाव यांचा महिमा वर्णिला आहे. हा श्लोक विशेषतः भक्ताने कसे वागावे, कशा प्रकारे अहंकारमुक्त राहावे आणि परमेश्वराच्या भक्तीत तल्लीन होऊन सेवाभाव कसा जोपासावा हे शिकवतो.

श्लोकात रामभक्ताचे गुण सांगताना रामदास स्वामी म्हणतात की, खरा भक्त कधीही 'उपेक्षी' नसतो, म्हणजेच त्याच्यात उपेक्षा, तुच्छता किंवा इतरांबद्दल दुर्लक्ष करण्याची वृत्ती नसते. तो नेहमीच विनम्र असतो आणि इतरांना सन्मानाने पाहतो. कारण त्याच्या मनात अभिमान किंवा अहंकार असत नाही. त्याचप्रमाणे, तो 'शिरी भार वाहेन' म्हणजे त्याच्या डोक्यावर सर्वांचा सेवा करण्याचे ओझे उचलतो, पण त्यात गर्व किंवा अहंकार बाळगत नाही.

'राम दासाभिमानी' या ओळीत स्वामींनी भक्ताचा गुणविशेष स्पष्ट केला आहे की, खरा भक्त हा रामाचा 'दास' असतो आणि त्याला सेवाभावाचा अभिमान असतो; परंतु त्या सेवेत अहंकार नसतो.

समर्थ रामदास स्वामींनी या श्लोकातून आपल्या शिष्यांना भक्तीच्या मार्गावर असताना कसा नम्रपणा ठेवावा, कशा प्रकारे आत्मसमर्पण भाव जोपासावा, आणि कर्तव्याच्या ओझ्याला सेवा म्हणून कसे पाहावे, हे शिकवले आहे. रामभक्ताला राम म्हणजेच परमेश्वर हा एकमेव आधार वाटतो, त्यामुळे त्याच्या जीवनात कशाचाही अभाव नसतो. त्याच्यामध्ये 'दास्यभाव' म्हणजेच सेवाभाव असतो, आणि हा भाव अहंकारमुक्त असतो.

श्लोकात 'शिरी भार वाहेन' या ओळीत सांगितले आहे की भक्त हा संसारातील सर्व प्रकारच्या कर्तव्यांचे ओझे वाहतो. त्याला संसारात अनेक प्रकारचे संघर्ष, आव्हाने, कष्ट आणि जबाबदाऱ्या येतात. पण खरा भक्त त्याकडे रामाच्या भक्तीचा एक भाग म्हणून पाहतो आणि त्या कर्तव्यांना आदराने स्वीकारतो. तो त्यात रामाचे स्मरण करून सर्व दुःख सहन करतो. या दृष्टिकोनातून भक्त हा संसारात असूनही त्याच्याशी असंलग्न राहतो आणि अहंकाराचा त्याच्यावर कोणताही प्रभाव पडत नाही.

रामदास स्वामींनी सांगितलेले हे तत्त्व अहंकारमुक्त जीवनाकडे नेणारे आहे. अहंकारामुळे माणूस इतरांवर तुच्छतेने पाहतो, उपेक्षा करतो आणि त्यामध्ये भेदभाव येतो. पण रामभक्त, जो 'रामरुपी' असतो, तो कधीही असे वागत नाही. त्याच्या मनात 'मी' किंवा 'माझं' अशी भावना नसते. तो कधीही इतरांबद्दल दुरावा ठेवत नाही, त्यामुळेच तो उपेक्षारहित राहतो.

आजच्या समाजातदेखील या श्लोकाचा मोठा महत्त्वपूर्ण अर्थ आहे. आपल्या रोजच्या जीवनात अनेक वेळा अहंकारामुळे आपण इतरांना कमी लेखतो, त्यांच्या कष्टांची, त्यांचे महत्त्व ओळखत नाही. पण रामदास स्वामींनी सांगितल्याप्रमाणे, भक्ताने (किंवा माणसाने) नम्रपणे आणि विनम्रतेने वागावे. यासाठी त्याने कर्तव्य पार पाडताना नम्रता, सेवा, आणि दास्यभाव बाळगावा.

समर्थ रामदास स्वामींचे हे विचार आदर्श जीवनाची शिकवण देतात.

# अक्कलकोट संस्थांनचे शस्त्रगार अपरिचित ऐतिहासिक ठेवा

.............

आशियाखंडातील सर्वात मोठं शस्त्रागार अक्कलकोट मध्ये आहे. श्री क्षेत्र अक्कलकोट म्हणजे महाराष्ट्रातील तमाम जनतेचे आराध्य श्री.स्वामी समर्थ यांची कर्मभूमी. अतिशय सुंदर असा हा परिसर.महाराष्ट्रसह कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेशातून मोठ्या संख्येने जनसमूह या ठिकाणी येतो. स्वामींच्या दर्शनाने प्रफुल्लित होतो. तस पाहता अक्कलकोट हे फक्त श्री स्वामी समर्थ यांची कर्मभूमी नसून या अक्कलकोटच्या मातीला खूप मोठा इतिहास आहे.स्वराज्य रक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांचे चिरंजीव आणि मराठा साम्राज्याचे ४२ वर्ष छत्रपती असलेले श्रीमंत थोरले शाहू महाराज यांचे मानसपुत्र श्रीमंत फतेहसिंहराजे भोसले यांचे हे संस्थान. छत्रपती संभाजी महाराजांच्या धर्मासाठीच्या बलिदान नंतर श्रीमान रायगडाला वेढा बसला आणि रायगड मुघलांच्या ताब्यात गेला. महाराणी येसूबाई आणि संभाजी राजांचे युवराज शिवाजी राजे हे मुघलांच्या कैदेत सापडले. पुढं औरंग्याला शिवाजी नावाची चीड असल्याने त्याने संभाजी राजांच्या मुलाचे नाव शाहुराजे ठेवले.तब्बत १७ वर्ष कैदे भोगल्या नंतर संभाजी पुत्र शाहूराजे औरंग्याच्या मृत्यूनंतर सुटून महाराष्ट्रात परत आले. शाहू राजे महाराष्ट्रात येत असताना मध्ये पारध गावच्या लोखंडे पाटलांनी त्यांच्या वर हल्ला केला यात शाहू राजांच्या सैन्याने लोखंडे पाटलांचा पराभव केला त्यात लोखंडे पाटील मारले गेले तेव्हा त्यांच्या बायकोने त्यांचं लहान मुल शाहू राजांच्या पायावर ठेवले आणि त्यांचा सांभाळ करायचं सांगुन त्या सती गेल्या. शाहू राजांच्या राणीवश्यातील विरुबाई यांनी या लहान मुलाची जबाबदारी घेतली. शाहू राजांचा हा पहिलाच विजय


JV MARKETING & INVESTMENTS

*Premium Residential & Corporate Real Estate Advisor*

*Sales And Marketing Of New Projects*
*Pre-leased Commercial & Retail Options*
*Business & Home Loan Assistance*

*Rahul V. Deshpande* — *+91 98330 25031*

*MBA - Marketing* — *jvmarketinginvestments@gmail.com*

*Samarth Raghukul, Gokhale Road South, Dadar West, Mumbai - 400 028*

*MahaRERA ID - A51900028785* *@jvmarketing18* *jvmarketing18*

**For enquiries and bookings in new projects across Mumbai, Thane and Navi Mumbai, kindly contact Rahul V. Deshpande - 98330 25031**

असल्याने त्यांनी या मुलाचं नाव फतेहसिंहराजे ठेवले आणि लोखंडे पाटलांचा तो लहान मुलगा शाहू राजांचा मानसपुत्र फतेहसिंहराजे भोसले नावाने नाव गाजवू लागला. फतेहसिंहराजे भोसले हे नाव इतिहासात खूप कमी लोकांना माहित आहे.  प्रचंड पराक्रमी, धोरणी, मुत्सुद्धी आणि तितकच दयावान म्हणून प्रसिद्ध आहे. शंभू पुत्र शाहू राजांनी कैदेतून सुटून आल्यावर अवघ्या काही महिन्यात सातारा येते आपली राजगादी स्थापन केली. ईसवी सण १७०९ ते १७४९ पर्यंत ४२ वर्ष शाहू महाराज यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार अगदी दिल्ली पर्यंत केला. १७१९ मध्ये दिल्लीवर भगवा फडकवला आणि आपल्या मातोश्री महाराणी येसुराणी यांची सुटका करून आणली.

थोरले शाहू राजांच्या मंत्री मंडळात फतेहसिंहराजे यांचा मान मोठा होता. एकदाही लढाई न हरलेला सेनानी म्हणून त्यांचा बहुमान कोणीही हिरावू शकत नाही. फतेहसिंहराजे मोहिमेला जायचे तेव्हा त्यांच्या सोबत मुख्य प्रधान म्हणजे पेशवा आणि पंत प्रतिनिधी यांना सोबत जायची सक्त ताकीद होती. फतेहसिंहराजे च्या पावला पावलाची खबर शाहू राजांना पोहचवायचे काम फडावरच्या लोकांचं होत. शाहू राजांच्या हुजराती सैन्याचे ते प्रमुख होते. वयाच्या अठराव्या वर्षी कर्नाटक मोहीम यशस्वी करत फतेहसिंहराजे नी आपल्या कर्तृत्वाचा झेंडा कर्नाटक, तामिळनाडू राज्यात फडकवला. छत्रपती शिवाजी महाराजांचे बंधू व्यंकोजी राजे यांच्या परिवाराशी चांगले संबंध प्रस्थापित करत फतेहशिह राजे यांनी दक्षिणेत मराठा साम्राज्य वाढवलं. पुढं जाऊन मराठ्यांनी राजधानी असलेला मुघलांनी ताब्यात घेतलेला रायगड किल्ला सुद्धा फतेहसिंहराजे यांनी जिंकून घेतला. अक्कलकोट ही फतेहसिंहराजे यांची जहागिरी होती. तिथं त्यांनी एक राजवाडा बांधला होता. स्वामी समर्थांच्या वटवृक्ष समाधी पासून मुख्य समाधी कडे जाताना रोडच्या डाव्या बाजूलाच तो राजवाडा दिसून येतो.

फतेहसिंहराजे यांना थोरले शाहू महाराज यांचे मानसपुत्र या नात्याने शाहू राजानंतर गादीवर बसण्याचा मान होता परंतु त्यांनी तो स्वीकारला नाही आपली जहागिरी अक्कलकोट ला येऊन त्यांनी १८ व्या शतकात आपलं अक्कलकोट संस्थान नावारूपाला आणल. अक्कलकोट संस्थांन हे राजे भोसले यांच्या खाजगितील मानाचे संस्थान मानल जात. पुढं. फतेहसिंहराजे यांच्या पुढील पिढ्यांनी संस्थांनाचा कारभार चालवला.

१८१८ मध्ये इंगर्जांनी भारतात पाय रोवले. होळकर, पवार, शिंदे, गायकवाड यांची सस्थाने मोडित काढली फक्त कोल्हापूर येथील छत्रपती घराणे म्हणजेच मराठा संस्थान इंगर्जांना नेस्तनाबूत करता आल नाही आणि ह्या कोल्हापूच्या छत्रपतींच्या सेकंड लेफ्टनंट पदी अक्कलकोटचे तिसरे फतेहशिह यांची नेमणूक केली होती त्यामुळे अक्कलकोट संस्थान गोऱ्यांना मोडीत काढता आले नाही. परंतु इंग्रज पाहिजे तेव्हा ह्या संस्थानिकांना युद्धात न्यायचे.

अक्कलकोट संस्थांनच्या मार्फत रस्त्यांची बांधणी, शेती पूरक व्यवसाय , शेती या गोष्टीवर तिसरे फतेहसिंहराजे यांनी विशेष भर दिला. तिसऱ्या फतेहसिंह राजांनी आपली स्वतंत्र सेना उभी केली होती. कमी वेळेत चांगली कामं करून कर्तुत्वाला आलेल्या तिसऱ्या फतेहसिंह राजांवर प्रजेच सुद्धा खूप प्रेम होत.  दिल्ली दरबारी सुद्धा अक्कलकोटचां राज्यकर्ता म्हणून त्यांची चांगली ओळख होती.

जेव्हा जर्मनी विरुद्ध इंग्लंड यांच्या पहिल्या महायुध्दाला तोंड फुटल तेव्हा भारतातून काही प्रमुख संस्थानचे राजे इंग्लंड च्या बाजूने लढण्यासाठी गेले त्यात फतेहसिह राजेंचा समावेश होता. ब्रिटिश रॉयल च्या ९व्यां रेजिमेंटची जबाबदारी फतेहसिंहराजांवर देण्यात आली.

इंग्रजांचा डाव-- इंग्रजांच्या वतीने तिसरे फतेहसिंहराजे फ्रान्सच्या रणभूमीवर चांगला पराक्रम गाजवू लागले. भारतातून गेलेल्या राज्यांपैकी ते सर्वात तरुण राजे होते. वयाच्या अठराव्या वर्षी त्यांनी रणांगणात

रक्त सांडवत अक्कलकोट भोसले घराण्याचा पराक्रमाचा वारसा दाखवून दिला. पुढं दोन महिने ते युद्धभूमीवर लढले तब्येत बिघडल्याने ते भारतात परत आले. परंतु युद्धात केलेल्या चांगल्या कामगिरी मुळे इंग्रजांनी त्यांचा सन्मान केला तेव्हा त्यांनी इंग्रजांना विनंती केली की आमच्या सैन्याने युद्धात वापरलेली शत्रे बंदुका आम्हाला आमच्या देशात अभिमानाने यायच्या आहेत. इंग्रजांनी सुद्धा परवानगी दिली आणि तुम्ही पुढं व्हा ही बंदुका बोटीने पाठवून देऊ म्हणून सांगितले. इकडे महाराज अक्कलकोट ला आले. त्यावेळी फतेहसिंहराजे यांनी नवीन राजवाड्याची बांधणी केली सोबतच एक शस्त्रागार बनवण्याच ठरवले. अक्कलकोट राज घराण्यात लक्षावधी पुरातन हत्यारे होती. त्यांच्यात तलवारी, भाले, कट्यारी, दांडपट्टे अशी वेगवेगळी हजारो हत्यारे होती. ती एका दालनात व्यवस्थित संग्रहित करून ठेवावीत असा फतेहसिंहराजे यांचा विचार होता. शिवाय इंग्रज सुद्धा त्यांना त्यांनी पहिल्या महायुद्धात वापरलेल्या बंदुका देणार होते. इंग्रजांनी बंदुका सुद्धा पाठवल्या. पाहता पाहता इंग्रजांच्या बंदुकांचे पेटारे अक्कलकोटमध्ये आले. ..पेटारे खोलले.... फतेहसिंहराजे यांनी पेटारे पाहिले आणि त्यांचा रागाचा पारा चढला शेवटी इंग्रजांनी त्यांची लायकी दाखवून दिली. इंग्रज अधिकाऱ्यांनी राजांच्या मागणीनुसार बंदुका पाठवून दिल्या होत्या परंतु इंग्रज मूळचे धूर्त त्यांनी विचार केला की कार्य, कर्तुत्व आणि पराक्रम भरपूर असलेल्या फतेहसिंहराजे यांनी पुढं जाऊन इंग्रजां विरुद्ध बंड केलं तर आपल्याच बंदुकांचे वापर इंग्रज अधिकाऱ्यांवर करू नये म्हणून इंग्रजांनी राजांना पाठवलेल्या बंदुका निकामी करून पाठवल्या, बंदुकांचे चाप , तोडून, नळ्या फोडून पाठवल्या ज्यानेकरून ह्या बंदुका फक्त दाखवण्यासाठी ठेवता येतील त्यांच्या युद्धात परत वापर होणार नाही.

आशिया खंडातील सर्वात मोठं शस्त्रागार...राजांनी आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या सर्व हत्यारांची यादी बनवून घेतली आणि आपल्या शस्त्रगारा मध्ये ही शस्त्रे अतिशय सुंदर पद्धतीने मांडून घेतली. भिंतीवर मावळत्या सुयांच्या आकारात, उगवत्या सूर्याच्या आकारात, त्रिकोणी आकारात अशा अनेक प्रकारे सर्व शस्त्रे एका भल्या मोठ्या दालनात भिंतीवर लावायच ठरवलं त्यासाठी एक इमारत बांधली. अतिशय देखणी अशी ही इमारत उभी राहिली. गोलाकार लोखंडी जिन्याने सहज वर जाता येईल अशी ही इमारत आज रोजी १०० वर्षाहून जुनी झाली आहे. या शस्त्रगारा मध्ये हजारो छोटया मोठया तलवारी, समशेरी, भाले, कुऱ्हाडी, कट्यारी, बंदुका, बाण अश्या कितीतरी प्रकारचे शस्त्र संवर्धित करून ठेवलेली आहेत. शिवाय राजांच्या काळात त्यांनी शिकार केलेल्या प्राण्यांची कातडी, यामध्ये, वाघ, मगर, अस्वल याच्या प्रतिकृती तसेच वेगवेगळ्या प्रकारची भांडी, त्या काळातील नाणी, मौल्यवान दगड, हस्तिदंत, लहान लहान खेळणी तसच इंग्लंड वरून आणलेल्या लहान गाड्या, खेळणी अशा अनेक वस्तूंचा संग्रह शस्त्रगार मध्ये पाहायला मिळतो.

महाराज फतेहसिह राजे यांनी वापरलेलं गजासान आपल्याला पाहायला मिळत. गजासन म्हणजे राजाचं हत्तीच्या पायापासून बनवलेले आसन. या आसनाला लाकडी पाय नसतात तर लाकडी पाया एवजी हत्तीचे अस्सल पाय बसवलेले असतात. अस हे गजासन आजही आपल्याला अक्कलकोट मध्ये पाहायला मिळत. शिवाय राजांची कपडे, चिलखत, जिरेटोप अशी रोजच्या वापरातील वस्तू सुद्धा पाहायला मिळतात.

अक्कलकोट संस्थानचे सध्याचे महाराज श्रीमंत मालोजीराजे छत्रपती हे असून संस्थानचं कामकाज पाहतात. प्रचंड शिस्त प्रिय आणि तितकेच प्रेमळ असलेले चिरतरुण मालोजीराजे आपल्या पूर्वजांचा वारसा अतिशय जबाबदारीने सांभाळत आहेत.

अक्कलकोट शहराच्या मध्य भागातच हे शस्त्र गार असल्याने शहरातून कुठूनही तुम्ही रिक्षाने जाऊ शकता. प्रवेश द्वारा जवळच १५ रुपयाचं तिकीट काढून आत प्रवेश केला की मोठ्या मैदानात आपल्याला शस्त्रगाराची इमारत दिसते. इमारतीच्या आजूबाजूला लहान मोठ्या तोफा ठेवलेल्या दिसतात. इमारतीत वरच्या मजल्यावर

हे शस्त्रगार आहे. शंभर वर्षापूर्वी मुंबईवरून आणलेला गोलाकार जिना आपल्याला शस्त्रागाराजवळ घेऊन जातो. तिथं माहिती सांगण्यासाठी दोन कर्मचारी नेमलेले आहेत.

आपल्याला आतमधील शस्त्र व इतर माहिती सांगतात. शस्त्रागार पाहून झाल्यावर आपण आजूबाजूचा मुलुखही पाहू शकता. सध्या श्री गणेश दिवाणजी हे श्रीमंत मालोजीराजे संयुक्ताराजे भोसले अक्कलकोट यांचे खाजगी सचिव म्हणून काम पहात आहेत.

## संलग्न संस्था वृत्त

**जळगांव** : दि. २३/१०/२०२४ रोजी दे. ऋ. ब्रा. संघ जळगाव तर्फे आयोजित कोजागिरीचा कार्यक्रम श्री.विलास देशमुख यांच्या घरी अत्यंत उत्साहात पार पडला. सुरवातीला सौ. विशाखा देशमुख यांनी प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले. त्यानंतर उपस्थितांनी आपापला परिचय दिला. देशस्थ ऋग्वेदी मध्यवर्ती मंडळ, माहीमचे उत्तर महाराष्ट्र कार्यवाह श्री. गणेश वढवेकर, भुसावळ यांनी मध्यवर्ती संस्थेच्या कार्याची व विविध योजनांची माहिती दिली, त्याचे स्वागत श्री.विवेक काटदरे सी. ए. यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. सौ. रश्मी कुरंभट्टी यांचे स्वागत सौ. स्वप्नगंधा जोशी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले, त्यानंतर त्याचे सुंदरसे किर्तन झाले. श्री. सुरेश झारे गुरूजींनी कोजागिरी पौर्णिमेचे महत्व सांगितले. कला सादरीकरणात सौ. विशाखा देशमुख व नंदु नागराज यांनी कविता सादर केल्यात, व एका लहान मुलीने लगेचच सुंदरसे चित्र काढून दाखवले. ॲड. सुहास जोशी यांनी नवीन कार्यकारिणी साठी इच्छुकांनी आपली नावे देण्याचे आवाहन केले व पुढील कार्यक्रम भरीत पार्टीचा घ्यायचा मानस व्यक्त केला. बहुभाषिक ब्राह्मण संघ, जळगावचे अध्यक्ष श्री. नितीन पारगावकर यांचेसह अनेक मान्यवर स्त्री व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी जेवण व दुग्धपानाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री. उदय खेडकर, सिध्दांत फडणीस यांचेही सहकार्य लाभले.

**मुंबई** : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या ८७ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी संस्थेच्या लक्ष्मीनारायण बाग सभागृहात सत्यनारायणाची महापूजेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई व उपनगरातील सर्व पदाधिकारी सन्माननीय सदस्य यांनी महापूजेच्या तीर्थप्रसादाचा लाभ घेतला. ✻ वर्धापन दिन दीपावली स्नेह मिलन निमित्ताने संगीत रजनी कार्यक्रमाचे दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं ५.३० वाजता आयोजन करण्यात आले होते. गायिका धनश्री देशपांडे, गायक डॉ. राहुल जोशी, निवेदिका धनश्री दामले वादक कलाकार ओंकार देवस्कर, पंकज धोपावकर, संदीप कुलकर्णी, किरण, मयुरेश शेरलेकर यांच्या भहारदार कार्यक्रमाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. संस्थेचे अध्यक्ष महेंद्र गंधे, कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी कार्यवाह मिलिंद सरदेशमुख, आनंद कुलकर्णी, नितीन शहापूरकर, गणेश वढवेकर कोषाध्यक्ष विनोद मांडके, तसेच रामचंद्र दिगवडेकर, विजय चावरे, सौ केतकी कुलकर्णी, सौ सुनीता रोझेकर, सौ ज्योती माधव जोशी, गिरीश कुलकर्णी आदी पदाधिकारी उपस्थित होते. मुलुंड संस्थेचे कार्याध्यक्ष श्री आडगावकर, श्री व सौ अग्निहोत्री व इतर मान्यवर सदस्य, कल्याण संस्थेचे जयंत देशमुख, पालकर, डोंबिवली संस्थेचे श्री रत्नपारखी, तसेच डॉ. येवलेकर, श्री धनंजय पांडे, व सौ संतोष मेकल, दादर संस्थेचे श्री मुकुंदराव हुल्याळकर, आणि श्री व सौ शरदचंद्र झरेगावकर, श्री व सौ जयप्रकाश देशपांडे, श्रीनिवास गोगटे सीए, ॲड आनंद नायक, शास्त्रीय गायक स्वानंद भुसारी आदी मान्यवर मुंबईतील सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते. दीपावली निमित्त एकमेकांना शुभेच्छा दिल्या. कार्यवाह आनंद कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**कल्याण** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण संस्थेच्या माध्यमातून यावर्षी दिपावली निमित्ताने कल्याण, ठाणे, पालघर, कर्जत परिसरातील खालील आदिवासी पाड्यावरील बंधू-भगिनींना, मुला-मुलींना, तसेच आधाराश्रम/बालिकाश्रमातील नागरिकांना/कर्मचारी वृंदास ६५० हुन अधिक दिवाळी फराळाच्या बॉक्सेसचे वाटप करण्यात आले. यात पुढील संस्थांचा समावेश होता - १) अनगांव येथील वानप्रस्थाश्रम, २) अनगांव येथील बालिकाश्रम. या दोन्ही संस्थांच्या कार्याची संपुर्ण माहिती ट्रस्टचे मुख्य प्रशासक श्री जोशी यांनी दिली संपुर्ण परिसर दाखवून त्यांच्या गरजांची जाणीव करून दिली. यात अनेकांशी गप्पा मारताना त्यांचा आनंद बघून छान वाटले, यावेळी प्रथम तेथील छोट्या मुला मुलींनी सुंदर अशा स्वागतपर गीताने आपल्या संस्था कार्यकर्त्यांचे स्वागत केले,

* वाडा तालुक्यातील वावेघर, देवळी, इतर पाड्यावरील आदिवासी जनतेला दिवाळी फराळ वाटप केले, यावेळी ट्रस्टचे विश्वस्त श्री पाटील यांनी स्वामी समर्थ ट्रस्ट बांधत असलेल्या मंदिराच्या बांधकाम व संपूर्ण प्रकल्पाची माहिती दिली. नंतर त्यांच्या बरोबर रूचकर जेवणाचा आस्वाद घेतला, यांत श्री रमेश पालकर, श्री जयंत देशमुख, श्री विजय चावरे, श्री राजेश देसाई यांनी सहभाग घेतला होता. * याचबरोबर कर्जत जवळील चिंचपाडा येथील आदिवासी पाड्या वरील बंधू भगिनींना संजिवनी आदिवासी ग्रुप, डोंबिवली, देऋब्रा कल्याण, व स्वामी विवेकानंद संस्था,बदलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी फराळ, कपडे इतर साहित्य वाटप करण्यात आले. यात सौ मुग्धा घाटे, श्री महाजन सर इतर सदस्यांनी बहुमोल योगदान दिले. * संस्थेमध्ये लक्ष्मी पूजन करतांना श्री गणेश, श्री एकनाथ महाराज, श्री समर्थ रामदास स्वामी तसबिरीचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले, नंतर कल्याण परिसरातील गरीब ब्रह्मवृंद, नागरिक व यांस संस्था कार्यालयात मनोज जवळेकर, श्री व सौ सावंत, श्री प्रमोद सांगली, श्री राजेश देसाई, श्री विजय चाव्हरे, श्री रमेश पालकर यांच्या हस्ते फराळ वाटप केले गेले. * अंबरनाथ जवळील कमलधाम वृध्दाश्रम, येथे फराळ वाटप केले गेले यांत




*Protect Capital & Create Wealth.....*

**JAYANT DESHMUKH**

B.COM. CAIIB DBM

**Insurance & Investment Consultant**

LIC (MDRT 2020) Mediclaim, Health Insurance & Mutual Fund

M. : 9930445721 / 9702837022

Email : deshijayant5@gmail.com

Off. : 106, Shrivatsam, First Avenue Business Park, Durgadi Chowk, Kalyan West - 421201
Resi. : Shree Ram Tower, Near Jain Society, Kalyan (West) 421301

LIC भारतीय जीवन बीमा निगम LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

- Joint Treasurer - Deshastha Rugvedi Brahman Sangha, Kalyan
- Manager - Laxmi Narayan Vadhu-Var Suchak Kendra, Kalyan
- Member - Brahman Business Network Group, Kalyan
- Past Manager, State Bank of India
- Director - MPFC Udyog Nidhi Ltd., Kalyan
- Trustee, Balaji Mandir Trust, Kalyan
- General Secretary, Karnataka Sangha, Kalyan
- Past Vice President, Andhra Association, Kalyan
- Prudent Partner - Mutual Fund Distributor / Company Deposit / Insurance

Get Insured... & Be Secured....

STAR Health Insurance Personal & Caring
The Health Insurance Specialist

श्री शेखर कुलकर्णी, श्री रमेश पालकर, श्री विजय चाव्हरे, श्री राजेश देसाई हे सहभागी झाले होते. * जीवन फाऊंडेशन, कल्याण यांना श्री जयंत देशमुख, श्री राजेश देसाई फराळ वाटप करताना सहभागी झाले होते. * नर्सिंग होस्टेल, कल्याण. येथील नर्सिंग भगिनींना फराळ वाटप करताना श्री जयंत देशमुख, श्री राजेश देसाई, श्री विजय चाव्हरे, श्री रमेश पालकर हे संस्था कार्यकर्ते सहभागी झाले होते. वरील संस्थांना/नागरिकांना संस्थेच्या सदस्यांनी सदस्यांनी भेट देऊन तेथील कार्याची/परिसरातील समस्यांची माहिती घेतली. यात सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात कल्याणातील ग्रामदैवत अक्षत गणपती यांस दिवाळी फराळ संस्थेचे कार्यवाह श्री रमेश पालकर यांच्या शुभहस्ते अर्पित करून करण्यात आली. या संकल्पनेचा समारोप दिवाळी पाडव्याच्या दिवशी कल्याण येथील श्री स्वामी समर्थ मठात दिवाळी फराळ स्वामी समर्थ यांस अर्पण करुन करण्यात आला. यावेळी संस्थेचे कार्यकारणी सदस्य श्री रमेश पालकर, श्री जयंत देशमुख, श्री शेखर संत उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कल्याण/मुंबई/ठाणे परिसरातील बहुसंख्य नागरिकांनी/सभासदांनी सढळ हस्ते मदत केली. तसेच संस्थेच्या कार्यकारणी सदस्य, पदाधिकारी, हितचिंतक, नागरिक यांनी बहुमोल योगदान दिले. सर्व दानशूर नागरिकांचे/सभासदांचे/कार्यकर्त्यांचे आपली संस्था मनापासून आभारी आहे.

**डोंबिवली** : देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली यांचा कोजागिरी पौर्णिमा महोत्सव २६ऑक्टोबर २०२४ला वक्रतुंड सभागृह गणेश संस्थान येथे, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष श्री प्रभाकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली, सर्व विश्वस्त, कार्यकारिणी आणि मोठ्या प्रमाणावर आलेल्या सभासदांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात साजरा झाला. सर्वप्रथम सर्व उपस्थित महिला सभासदांनी सुरेख भोंडला सादर केला ज्याचे नेटके नियोजन महिला समिती प्रमुख सौ. शुभदा कुलकर्णी व सहकार्यवाह सौ. निलीमा चिंचणकर यांनी केलं होतं.

सर्व वयोगटातील महिला सभासदांनी, भोंडल्याच्या पारंपारिक गाण्यावर धरलेला तालबद्ध फेर हे अतिशय सुंदर दृश्य पहात रहावे असेच होते. मग खमंग खाऊच्या खिरापतीची पाकीटे वाटण्यात आली आणि तदनंतर मुख्य कार्यक्रमास प्रारंभ झाला. सौ शुभदा कुलकर्णी यांनी सर्वांचं स्वागत केलं आणि कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व विशद केले.

संस्थेचे अध्यक्ष श्री जगन्नाथ जोशी यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, कोजागिरी पौर्णिमा हा आपल्या संस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे कारण १९६९ साली ह्याच दिवशी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवली या संस्थेचा शुभारंभ झाला आणि ५५ वर्षांपूर्वी लावलेल्या रोपट्याचा आता विशाल वटवृक्ष झाला आहे, तसेच कार्यकारिणीच्या व इतर सर्व सभासदांच्या उत्तम सहकार्यामुळे संस्था उत्तरोत्तर लक्षणीय प्रगती करत आहे .

संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना अध्यक्ष श्री जे के जोशीनी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवलीतर्फे भविष्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी संध्याकाळी ५ ते८ या वेळात एकत्र जमून मनोरंजन व बुद्धीवर्धन करण्याच्या सुविधा असलेले विश्रामगृह अर्थात् डे-केअर केंद्र उभे करण्याच्या प्रकल्पाची कल्पना मांडली तेव्हा टाळ्यांच्या कडकडाटाने उपस्थितांनी तिचे स्वागत केले अमृत पुत्रांचा सत्कार अर्थात २०२४ मध्ये वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व सभासद बंधू-भगिनींच्या सत्काराच्या कौतुक सोहळ्याची घोषणा संस्थेच्या सहकार्यवाह सौ निलीमा चिंचणकर यांनी केली व सत्कारमुर्तींची नावे पुकारत हा कार्यक्रम सुरू झाला. सर्व अमृत पुत्रांना चांदीचे नाणे आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेने केलेल्या या कौतुक सोहळ्याने भारावून जाऊन अनेक उत्सव मूर्तींनी संस्थेला उदारहस्ते देणग्या दिल्या व संस्थेवरचे आपले प्रेम व्यक्त केले. मग मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि रोख रकमेची पारितोषिके देऊन गौरव केला गेला

तसेच महिला समितीतर्फे झालेल्या विविध स्पर्धांमध्ये प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवलेल्या महिला सभासदांचा महिला समिती प्रमुख सौ.शुभदा कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला. या वर्षी आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या ब्राह्मणेतर समाजातील १६ विद्यार्थी व विद्यार्थिनीना प्रत्यक्ष बोलवून शालेय फी भरण्यासाठी संस्थेकडून आर्थिक मदत करण्यात आली. सहकार्यवाह अनुराधाताई मोहिदेकर यांनी या मुलांना हवे असलेल्या आर्थिक सहाय्याची नितांत आवश्यकता सांगितली तर युवा समितीच्या कार्यकारिणी सभासद ॲडव्होकेट सौ. माधुरी जोशी यांनी या उपक्रमाची माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री प्रभाकरपंत कुलकर्णी या सर्व उपक्रमांबद्दल संस्थेचे अध्यक्ष जे के जोशी यांचे व सर्व कार्यकारिणीचे भरभरुन कौतुक करुन डे केअरची कल्पना उचलून धरली व आपली मुळे घट्ट करुन सर्व ब्राह्मणांना एकत्र करुया असा संदेश दिला. तसेच पुढील वर्षापासून आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करण्याच्या कार्यात मध्यवर्ती मंडळातर्फे भरघोस मदत करण्याचे आश्वासन दिले.

स्वरनिनाद या संगीतवृंदाचा रातके हमसफर हा सुमधुर हिंदी मराठी गीतांचा मनभावन कार्यक्रम श्री प्रशांत ढेरे, शुभदा पाठक नंदकुमार घाडीगावकर, सुरभी कुलकर्णी या गायक गायिकांनी मधुर स्वरांनी कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढली. ॲड. माधुरी जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभदा कुलकर्णी यांनी केले तर सहकार्यवाह सौ. निलीमा चिंचणकर यांनी सोहळ्याची पूर्ण तयारी केली. सोहळा संपन्न होण्यासाठी युवा समितीच्या सर्व सदस्यांनी अतिशय मोलाचे सहकार्य केले.

**मंगळवेढा :** दरवर्षी प्रमाणे कोजागिरी पोर्णिमेचा उत्सव व अखिल देशस्थ ऋग्वेदी बाह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या शैक्षणिक बक्षिस वितरणाचा कार्यक्रम दि १८ ऑक्टोंबर २०२४ रोजी लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय किल्ला भाग, मंगळवेढा येथे संपन्न झाला.सदर कार्यक्रमाचे निमित्ताने मंगळवेढयाचे ज्येष्ठ पुरोहित श्री पंढरीनाथ तथा बंडोपंत जोशी यांचे वाचन संस्कृती प्रगल्भ बुध्दीमत्तेसाठी गरज या विषयावर जाहिर व्याख्यान आयोजीत करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मंगळवेढा पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रभाकर कुमठेकर यांनी भूषविले. समाजबांधव तसेच गुणवंत विध्यार्थी आपल्या पालकांसह या कार्यक्रमास उपस्थित होते.

अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ सदर कार्यक्रमाचे निमित्ताने मंगळवेढयाचे ज्येष्ठ पुरोहित श्री पंढरीनाथ तथा बंडोपंत जोशी यांचे वाचन संस्कृती प्रगल्भ बुध्दीमत्तेसाठी गरज या विषयावर जाहिर व्याख्यान आयोजीत करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मंगळवेढा पेन्शनर संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रभाकर कुमठेकर हे उपस्थित होते. समाजबांधवांनी तसेच गुणवंत पाल्य आपल्या पालकांसह या कार्यक्रमास उपस्थित होते.

## जोडीदार निवडा

**वधू पाहिजे..........................................................................................**

✻ **अमेय प्रविण पाठक** (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख : ०७/०२/१९९२, जन्म वेळ : सकाळ ७.४५, जन्म ठिकाण : ठाणे, उंची : ६, गोत्र : वत्स, रास : मीन, नक्षत्र : पुर्वाभाद्रपद, चरण : ४, नाडी : आद्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी.कॉम (फर्स्ट क्लास), नोकरी/ व्यवसाय : ए. एच ॲण्ड कंपनी (कल्याण), वार्षिक उत्पन्न : ३.५० लाख, अपेक्षा : सुसंस्कृत, समजुतदार व नोकरी करणारी, संपर्क : ९८२०६९४०२८

* **मयुरेश अशोक बोकील** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २७/११/१९९४, जन्म वेळ : सायंकाळी ०५.४२, जन्म ठिकाण : डोंबिवली, उंची : ५.७, रक्तगट : बी (+), गोत्र : जमदग्नी, नक्षत्र : पुर्वा फालगुनी, चरण : ४, नाडी : मध्य, गण : मनुष्य, शिक्षण : एफ.वाय.बीकॉम, नोकरी/ व्यवसाय : स्वत:चे पुजाभांडार दुकान आहे, मासिक उत्पन्न : ५० हजार, अपेक्षा : मन मिळावू, गृहकर्तव्यदक्ष, संपर्क : ९३२३६७३०२७/ ९३२२२४३८७९
* **अभिषेक नंदन काळे** (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख : २१/१२/१९९४, जन्म वेळ : सकाळ ११.५४, जन्म ठिकाण : दौंड, उंची : ५.७, रक्तगट : एबी (+), गोत्र : भारव्दाज, रास : कर्क, नक्षत्र : पुष्य, चरण : ३, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : एम.ट्रेक-प्रॉडक्ट डिझाइन (बी.इ.मेकॅनिकल), नोकरी/ व्यवसाय : प्रोजेक्ट इंजिनियर, वार्षिक उत्पन्न : १०लाख ६०हजार, अपेक्षा : अनुरूप, नोकरी करणारी, संपर्क : ९६१९२६१९३२/९१६७०६५४६२
* **ऋषिकेश गुरूनाथ काळे** (ऋग्वेदी ब्राह्मण), जन्म तारीख : ०६/११/१९९१, जन्म वेळ : पहाटे ४.३७, जन्म ठिकाण : मुंबई, उंची : ५.९, गोत्र : वत्स, रास : तुला, नक्षत्र : स्वाती, चरण : २, शिक्षण : बी.कॉम, नोकरी/ व्यवसाय : खाजगी नोकरी, मासिक उत्पन्न : ५०हजार, अपेक्षा : शिकलेली मुलगी पाहिजे, संपर्क : ९३२४३४०६५०/९८६९७५०५७३
* **अभिजीत हेमंत देशपांडे** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : १९/१२/१९९१, जन्म वेळ : दुपारी ४.४०, जन्म ठिकाण : मुंबई, उंची : ५.६, रक्तगट : एबी (+), गोत्र : कामायन, रास : वृषभ, नक्षत्र : कृतिका, चरण : ३, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : बी. कॉम. सीए फायनल पार्ट १ पास, नोकरी/ व्यवसाय : सीए फर्म चेंबूर येथे नोकरी तसेच स्वत:ची फ्रीलांयन्स प्रॅक्टीस, वार्षिक उत्पन्न : १२लाख, अपेक्षा : अनुरूप, मनमिळावू, पदवीधर, शक्यतो नोकरी, व्यवसाय करणारी, संपर्क : ९७६९०१६११२/९८३३२७१७४५
* **चिन्मय जयंत जाईल** (चित्पावन), जन्म तारीख : २५/११/१९९१, जन्म वेळ : दुपारी ४.१५, जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५.७, गोत्र : कपि, रास : सिंह, नक्षत्र : मघा, चरण : २, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : १२ वी पास नंतर आयटी डिप्लोमा, नोकरी/ व्यवसाय : आय टी इंजिनियर, मासिक उत्पन्न : २० हजार, अपेक्षा : नोकरी करणारी किमान १२वी पास, नर्सिंग, संपर्क : ९९३०२३१९३८
* **तेजस उमेश जोशी** (देवरूखे), जन्म तारीख : २४/०५/१९९४, जन्म वेळ : रात्री ९.१५, जन्म ठिकाण : बडोदा, उंची : ५.७, रक्तगट : ए (-), गोत्र : काश्यप, रास : वृश्चिक, नक्षत्र : विशाखा, चरण : ४, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : इलेक्ट्रीकल इंजिनियर, नोकरी/ व्यवसाय : बी.इ टेलीडाइन हंसन रीर्सच(एम एन सी), वार्षिक उत्पन्न : ६ लाख, अपेक्षा : मनमिळावू, एकत्र कुटूंबात राहणारी, पदवीधर, नोकरी असावी, नसली तर करण्याची तयारी असावी, संपर्क : ८१०४५५७१६०
* **तेजस अरूण कुलकर्णी** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ११/१०/१९९३, जन्म वेळ : दुपारी २.५७, जन्म ठिकाण : डोंबिवली, उंची : ५.९, गोत्र : भारव्दाज, रास : कर्क, नक्षत्र : अश्लेषा, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : बी. इ. (आय्.टी), नोकरी/ व्यवसाय : फर्स्टस्टॅन्ड सर्विस प्रायव्हेट लि., वार्षिक उत्पन्न : २४लाख ५०हजार, अपेक्षा : शाकाहारी, सडपातळ, नोकरी करणारी, संपर्क : ८२९१०३६०७९/ ९८१९३९०९८३
* **अनुप अरूण बोकील** (देशस्थ ऋग्वेदी) घटस्फोटित, जन्म तारीख : १५/०३/१९८६, जन्म वेळ : ०४.४९, जन्म ठिकाण : ठाणे, उंची : ६.४, रक्तगट : ओ (+), गोत्र : जमदग्नी, रास : मेष, नक्षत्र : भरणी, चरण : ३, नाडी : मध्य, गण : मनुष्य, शिक्षण : एच.एस.सी सायंन्स, नोकरी/ व्यवसाय : फोटोग्राफी आणि फिल्मिंग, वार्षिक उत्पन्न : ६/७ लाख, संपर्क : ७५८८००६६६२

* **सौरभ सुहास आंबेवाडीकर** (देशस्थ ऋग्वेदी) घटस्फोटित, जन्म तारीख : २३/१२/१९८३, जन्म वेळ : दुपारी ०३.२२, जन्म ठिकाण : नाशिक, उंची : ५.८, रक्तगट : बी (+), गोत्र : हरीतस, नक्षत्र : अश्लेषा (शांती केली आहे), चरण : २, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण : बी. कॉम, एम.बी.ए (मार्केटींग), पी एच डी करीत आहे, नोकरी/ व्यवसाय : के.के.वाघ इंजिनियरींग कॉलेज नाशिक येथे असिस्टंट प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे, वार्षिक उत्पन्न : ४.२५ लाख, अपेक्षा : पदविधर, गृहकृत्यदक्ष, दिसण्यास सुंदर, नोकरी असल्यास प्राधान्य, चष्मा नसावा, संपर्क : ०२५३/२५९२५५२/९८६०४६७७६६

**वर पाहिजे** ..........................................................................................

* **श्वेता मिलिंद बोपर्डीकर** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २५/०६/१९९४, जन्म वेळ : सकाळी ०६.३० जन्म ठिकाण : विलेपार्ले, उंची : ५.९, रक्तगट : ए (+), गोत्र : वसिठ, रास : मकर, नक्षत्र : उत्तराषाढा, चरण : २, नाडी : अंत्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी.कॉम, चार्टेड अकाउंटन्ट (सीए), सी एम.ए. (युएस) नोकरी/ व्यवसाय : असिस्टंट मॅनेजर (अर्नेस्ट अँड यंग), अपेक्षा : अनुरूप, सुशिक्षित, व्यावसायिक दृष्ट्या प्रशिक्षित, समजूतदार, संपर्क : ९८७०७४६७६२/९८७०७४६७६२
* **स्नेहल मिलिंद पाठक** (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख : २७.१०.१९९०, जन्म वेळ : सकाळी ७.१७, जन्म ठिकाण : नाशिक ,उंची : ५.५, रक्तगट : ओ (+), गोत्र : वत्स, रास : मकर, नक्षत्र : श्रवण, नाडी : अंत्य, गण : देव, शिक्षण : बी एम एस, सॅप, नोकरी/ व्यवसाय : एच आर. हेड, वार्षिक उत्पन्न : २१ लाख, अपेक्षा : पोस्ट ग्रॅजुएट, इंजिनियर, सीए,फायनान्स मॅनेजर/ एम. बी. ए उत्पन्न २०लाखावर, स्वत:चे घर असावे, संपर्क : ९७७३७२३३७९/९८१९७५३०४९
* **अक्षता अरविंद मुजूमदार** (देशस्थ यजुर्वेदी), जन्म तारीख : २७.०६.१९८५, जन्म वेळ : सकाळी ९.४०, जन्म ठिकाण : डोंबिवली ,उंची : ५, रक्तगट : ए (+), गोत्र : कौशिक, रास : तूळ, नक्षत्र : चित्रा, चरण : ३, नाडी : मध्य, गण : राक्षस, शिक्षण : बी कॉम सॉफ्टवेअर डिप्लोमा ॲपटेक मधून जावा मध्ये स्पेशलायझेशन, नोकरी/ व्यवसाय : निर्मल उज्वल क्रेडिट सो. (मस्टीस्टेट), मासिक उत्पन्न : १५ हजार, अपेक्षा : इंजिनिअर, एम बी ए विज्ञान शाखा, उंची ५.८ पर्यंत चालेल, पुण्याचा चालेल, मुंबई चालेल, संपर्क : ९८१९०१४७९४

**मंजुषा अविनाश आमडेकर** (देशस्थ ऋग्वेदी ब्राण), जन्म तारीख : २८.०८.१९७३, जन्म वेळ : दुपारी ०२.००, जन्म ठिकाण : ठाणे, उंची : ५.४, रक्तगट : ए (+), गोत्र : शांडिल्य, रास : सिंह, नक्षत्र : पुर्वा, चरण : १, नाडी : मध्य, गण : मनुष्य, शिक्षण : बी.एससी, नोकरी/ व्यवसाय : नोकरी नाही, अपेक्षा : शक्यतो कोकणस्थ, कऱ्हाडे प्रथमवर, अव्यंग निर्व्यसनी, अनुरूप, नोकरी करणारा, मुंबई, ठाणे, डोंबिवली उपनगरात राहणारे, संपर्क : ७७४४८२३२१२/९१६८४६५५६३ (सूचना : संपर्क सायंकाळी ७ ते ९ या वेळेत करावा.)

* **गायत्री धनंजय गोरे** (देशस्थ कऱ्हाडे), जन्म तारीख : ०२.०६. १९८३, जन्म वेळ : दुपारी ०३.००, जन्म ठिकाण : डोंबिवली, उंची : ५.२, रक्तगट : ए बी (+), गोत्र : पारशर, रास : कुंभ, नक्षत्र : धनिष्ठा, गण : राक्षस, शिक्षण : बी. इ. (सीवील), एम. इ. (स्ट्रक्चरस) एम. एस. सी. एडव्हायझरी जीओ टेक्नीकल इंजिनियरींग यूनिर्वसिटी यु के, नोकरी/ व्यवसाय : डिझायनर मॅनेजर (स्ट्रक्चरस), वार्षिक उत्पन्न : १० लाख, अपेक्षा : सुशिक्षित, दयाळू, समजून घेणारा, संपर्क : ९८३३६५३०११
* **सुजाता गोपाळ परांजपे** (कोकणस्थ ब्राण), जन्म तारीख : २१/१०/१९७३, उंची : ५.३, रक्तगट : ओ (+), गोत्र : विष्णुवृध्द, रास : सिंह, नक्षत्र : मघा, चरण : १, नाडी : अंत्य, गण : राक्षस, शिक्षण :

ग्रॅज्युएट बी.ए वीथ इकॉनॉमिक्स + कॉम्पुटर कोर्स, नोकरी/ व्यवसाय : सुमारे २२ वर्षांचा नोकरीचा अनुभव, सध्या नोकरी करत नाही, नोकरी करण्याची आवड/तयारी आहे, अपेक्षा : ब्राह्मण पोटशाखा, नोकरी अथवा व्यवसाय सुस्थापित, प्रथम वर, आणि विनापत्य घटस्फोटित चालेल, शाकाहारी, संपर्क : ९००४५२५३८०/ ९९६७५८१०१३

* **नेहा मुळये** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : ०३/०२/१९९७, जन्म वेळ : पहाटे ०३.२८ जन्म ठिकाण : मुंबई, उंची : ५.२, रक्तगट : ओ (–), गोत्र : अत्रि, रास : वृश्चिक, नक्षत्र : अनुराधा, चरण : ४, नाडी : मध्य, गण : देव, शिक्षण : बी.ए ऑनर्स इन इंटेरीयर आरकीटक्चर् अँड डिझाइन फ्रोम नोटीघम ट्रेन्ट युनिर्वसीटी (परेल अकॅडमी इंडिया) नोकरी/व्यवसाय : मुंबई, रेड आर्किटेक्ट (इंटेरीयर डिझाइनर), अपेक्षा : अनुरूप, संपर्क : ९८६७७६८८०८/९१६७१४७२९१

* **तनया मंगेश कुलकर्णी** (देशस्थ ऋग्वेदी), जन्म तारीख : २१/११/१९९८, जन्म वेळ : पहाटे ०१.२९ जन्म ठिकाण : अंबरनाथ, उंची : ५.४, रक्तगट : ओ (+), गोत्र : विश्वामित्र, रास : वृश्चिक, नक्षत्र : जेष्ठा, नाडी : आद्य, गण : राक्षस, शिक्षण : बी. इ, एम. एस, युएस, नोकरी/ व्यवसाय : इनफ्रा इंजिनियरींग, वार्षिक उत्पन्न : ७० हजार युएस डॉलर, अपेक्षा : अनुरूप, मिनिमम मास्टर्स, युएसमध्ये नोकरी असावी, संपर्क : ९८६७४३३१५२/९८६९३९२९३१

* **भक्ती गोपाळ पुरोहित** (देशस्थ ऋग्वेदी) घटस्फोटित, जन्म तारीख : २६/११/१९८६, जन्म वेळ : दुपारी ०२.२५ जन्म ठिकाण : डोंबिवली, उंची : ५.३, रक्तगट : बी (+), गोत्र : वशिष्ट, रास : सिंह, नक्षत्र : उत्तरा फाल्गुनी, चरण : १, नाडी : आद्य, गण : मनुष्य, शिक्षण : एम.ए.बी. इडी, नोकरी/ व्यवसाय : सध्या नोकरी करत नाही, अपेक्षा : समजुन घेणारा, कुटुंबवत्सल, काळजी घेणारा, निर्व्यसनी, ब्राह्मण, घटस्फोटित किंवा विनापत्य, किंवा ५ वर्षाखालील अपत्य चालेल, पत्रिका पाहणार, मातृ कुटुंबाशी जुळवून घेणारा, संपर्क : ८३५६९४७०९०

* **सिरीजा जीतेंद्र पाठक** (देशस्थ यजुर्वेदी) विधवा, जन्म तारीख : ०९/११/१९८६, जन्म वेळ : ०३.१५ जन्म ठिकाण : कल्याण, उंची : ५.४, रक्तगट : बी (–), गोत्र : पाराशर, नक्षत्र : धनिष्ठा , चरण : २, नाडी : मध्य, गण : राक्षस, शिक्षण : टी. व्हाय. बी कॉम, नोकरी/ व्यवसाय : एनजल वन लि., अपेक्षा : निर्व्यसनी, माझ्या मुलाचा स्वीकार करणारा, संपर्क : ९९३०२५०१६२

**(टीप : स्थळांची माहिती पडताळून घेण्याची जबाबदारी मंडळ घेणार नाही, ती तुमची स्वतःची राहील)**


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

**अद्यावत नूतनीकरण केलेली सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर – माहीम विभागातील तळमजल्यावरील वातानुकूलीत सर्व अद्यावत सोयीयुक्त सभागृह. दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह. वधू–वरांसाठी प्रशस्त खोल्या, स्वयंपाकासाठी प्रशस्त किचन मंगलकार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय राखून ठेवा. सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य–तालीम, संमेलन ह्यासाठी पण उपलब्ध.**

**अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ**

**लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई – ४०० ०१६.**

**दूरध्वनी : २४३०२२७३/२४३०७५७६ Email : aadrbm@gmail.com**

# सायबर गुन्हे

**प्रवीण दीक्षित (माजी पोलीस महासंचालक, मुंबई)**

'प्रतिदिन आणि प्रत्येक ठिकाणी सायबर गुन्ह्यांच्या संख्येत होणारी भौमितिक वाढ ही केवळ चिंताजनकच नाही, तर वेदनादायीही आहे. श्रीमंत किंवा गरीब, सुशिक्षित किंवा अशिक्षित, पुरुष आणि स्त्रिया, वृद्ध, तसेच तरुण असो जवळजवळ प्रत्येक जण यामध्ये फसत आहे. याला कुणीही अपवाद नाही. गुन्हेगार सहसा अदृश्य असतात आणि दिसल्यास त्यांची ओळख बनावट असते. फसलेले लोक भोळे, संशय न बाळगणारे असतात. ते सहजपणे डावपेचांना फसतात. हे पीडित लोक बहुतेक वेळा लाज किंवा भीती वा जागरूकतेच्या अभावामुळे या गुन्ह्यांची तक्रार करत नाहीत. जेव्हा त्यांची फसवणूक झाली आहे, हे त्यांना कळते, तेव्हा बराच काळ निघून गेलेला असतो आणि तोपर्यंत व्यवहार पूर्ण होऊन हस्तांतरित केलेली रक्कम गुन्हेगारांनी काढून घेतलेली असते. **१. पीडितांना फसवण्यासाठी सायबर गुन्हेगारांकडून विशिष्ट तंत्राचा वापर –** सायबर गुन्ह्यांचे स्वरूप ठिकाण आणि घटना यांनुसार पालटते. ती खोट्या 'पोर्टल'द्वारे (संकेतस्थळाद्वारे) 'इक्विटी मार्केट'मधील (आस्थापनाच्या समभागाच्या व्यवहारासाठी उपलब्ध व्यासपीठ) गुंतवणूक असू शकते, ती एखाद्या नामांकित कंपनीच्या नावाने नोकरीची आकर्षक योजना असू शकते, तो वैवाहिक प्रस्ताव असू शकतो किंवा त्याला 'डिजिटल अटक' म्हटले जाऊ शकते. ('डिजिटल अटक', म्हणजे सायबर गुन्हेगार कायदे-नियमांची जरब दाखवत लोकांची फसवणूक करणे) सायबर गुन्हेगार पीडितांना फसवण्यासाठी 'एस.ई.ओ.' ('सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन', म्हणजे विशिष्ट प्रकारचे तंत्र वापरून स्वतःचे संकेतस्थळ किंवा 'ब्लॉग' सर्च इंजिनमध्ये मानांकन करण्याची प्रक्रिया) अधिकाधिक लाभ घेत आहेत. 'एस.ई.ओ.'च्या हाताळणीमुळे गुन्हेगारांना फसव्या संकेतस्थळांना शोध परिणामांच्या शीर्षस्थानी स्थान देण्याची अनुमती मिळते. त्यामुळे ही संकेतस्थळे वैध आणि विश्वासार्ह वाटतात अन् संवेदनशील अशी वैयक्तिक अन् आर्थिक माहिती सामायिक करण्यासाठी पीडितांची फसवणूक करतात. फसवणूक करणारे बनावट (खोटे) संकेतस्थळ सिद्ध करतात, जी वैध व्यवसाय, ऑनलाईन दुकाने किंवा आर्थिक आस्थापन वाटते. **२. पीडित व्यक्तीची विविध प्रकारे खासगी माहिती मिळवण्याचा सायबर गुन्हेगारांचा प्रयत्न –** तुमच्या संकेतस्थळाला शोधण्याच्या प्रक्रियेत सर्वोच्च स्थान मिळवून देण्यासाठी सशुल्क प्रक्रिया आहे. अशी संकेतस्थळे मूळ संकेतस्थळासारखीच दिसतात. जेव्हा पीडित व्यक्ती पुढे जाते, तेव्हा एका माध्यमातून पैसे तिसऱ्या व्यक्तीकडे हस्तांतरित केले जातात. पीडिताची कागदपत्रे तिसऱ्या पक्षाशी सामायिक करतांना बँक कर्मचारी हे अशा गुन्ह्यांचा भाग असू शकतात, असा संशय आहे. बँक खातेधारकाचे 'के.वाय.सी.' (खातेधारकाची ओळख पटवण्यासाठीची कागदपत्रे) अद्ययावत् केले गेले पाहिजे; परंतु अनेक बँका याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे खात्याच्या माहितीचा मागोवा घेण्यात अडचणी येतात. कर्जाची 'प्स' आणि 'गेमिंग प्स' (ऑनलाईन खेळ खेळण्याची प्रणाली) हे खासगी माहिती गमावण्याचे आणखी एक माध्यम आहे. 'फेडेक्स' कुरियरच्या नावे करण्यात येणारा घोटाळा सध्या शिखरावर आहे. कधी कधी आकर्षक सवलत देणाऱ्या अज्ञात आणि बनावट व्यक्तीच्या कॉलद्वारे सायबर गुन्हे घडू शकतात किंवा कधीही न घडलेल्या गुन्ह्यासाठी धमकी देऊ शकतात. गॅस जोडणी देणाऱ्या कंपनीच्या नावाने तुम्हाला तुमचे वैयक्तिक तपशील अद्ययावत् करण्यास सांगतात आणि बँक खात्याचे तपशील मागणे, असे होऊ शकते. संगणकीय पत्राद्वारे तुम्हाला तुमचे वैयक्तिक बँक तपशील देण्यास सांगितले जाऊ शकते किंवा 'व्हिडिओ कॉल'द्वारे तुम्हाला 'डिजिटल अटक' केली जाऊ शकते आणि त्वरित मोठ्या रकमेची मागणी केली जाऊ शकते. पैसे भरून पूर्ण होईपर्यंत फसवणूक करणारे खोलीच्या बाहेरही जाऊ देणार नाहीत. निवृत्तीनंतरचे लाभ आकर्षक परताव्यात गुंतवू इच्छिणाऱ्या अलीकडेच निवृत्त झालेल्या व्यक्ती किंवा भारतात अथवा परदेशात नोकरीचा प्रस्ताव शोधत असलेले बेरोजगार तरुण याला फसू शकतात वा अशा प्रकारे फसण्यामध्ये लग्नाच्या प्रस्तावात स्वारस्य असलेली एक तरुण स्त्री असू शकते. (क्रमशः)


IndusInd Bank
THE ULTIMATE SAVINGS ACCOUNT IS HERE
%
Attractive Interest Rates*
on savings account and fixed deposits
My ACCOUNT My NUMBER
Freedom to choose your account number
GET UP TO 20%* OFF
on food & groceries from Swiggy & BigBasket
BUY ONE GET ONE FREE
movie ticket on BookMyShow*
Complimentary Airport Lounge Access*
Attractive discount on all locker types
Indus Mobile
All-in-one app for banking, shopping, travel, payments and much more
AutoPay
Manage your payments & SIPs using UPI, cards & mobile
*T&C Apply
To know more, please speak to our Customer Service Manager or visit us at www.indusind.com


स्नेहाचा सुगंध दरवळला
आनंदाचा सण आला
विनंती आमची परमेश्वराला
सौख्य, समृद्धी लाभो तुम्हाला
आमच्या सर्व सभासदांना, ग्राहकांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना...
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
SAMARTH
URBAN CO-OP. CR. SOCIETY LTD.
HEAD OFFICE: Samarth Sadan, Gurukrupa Complex, 1st Floor, Maruti Galli, Belgaum. Ph.: 2431357
RC Nagar Branch: Bhagirathi, C Scheme, Channama Nagar Main Road, Belgaum. Ph.: 2443161
Tilakwadi Branch: Samarth Landmark, Opp. Indian Bank, Mangalwar Peth, Tilakwadi, Belgaum. Ph.: 2430357
Shahapur Branch: 1103, Ground Floor, Bichu Galli, Shahapur, Ph.: 2431257
Khanapur Branch: 1524/A6, Manerikar Bldg., Belgaum-Goa Road, Ph.: 6363090655
चेअरमन
ॲड. अजय ए. सुनाळकर
व्हा. चेअरमन
अभय व्ही. जोशी
संचालक मंडळ
गणपत ए. कुलकर्णी
विनायक जी. जोशी
प्रदीपकुमार जी. कुलकर्णी
अरविंद एस. कुलकर्णी
मालतेश जी. पाटील
सुनंदा सी. आळतेकर
छाया एन. जोशी
अनिल व्ही. भंडारी
उमेश सुणगार
परशुराम एम. कांबळे
अशोक एच. पुजेरी
राघवेंद्र एस. केसनूर
सेक्रेटरी
गौरी एस. बिडी
जन. मॅनेजर
सहकार क्षेत्रात बेळगाव जिल्ह्यात अग्रेसर असलेली पतसंस्था

**Samachar Patrika RNI 16775/1967 Regd. No. MCW-126/2024-26,** Published on 15th of every month. Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.

**मध्यवर्ती संस्था आयोजित 'दीपावली संगीत रजनी' कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना**
**सौ. मेकल, सौ. रोझकर, सौ. ज्योती जोशी**




Printed and Published by MILIND MALHARRAO SARDESHMUKH on behalf of AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL,Printed at GURUKRUPA, 03, ROSSARY BUILDING, M M C ROAD, MAHIM (WEST), MUMBAI 400 016 and Published from AKHIL DESHASTHA RUGVEDI BRAHMAN MADHYAWARTI MANDAL, LAXMI NARAYAN BAUG, BAL GOVINDAS MARG, MAHIM, MUMBAI 400 016. Editor : MILIND MALHARRAO SARDESHMUKH